बुधवार, दि १९ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २० वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# शिवजन्मोत्सवानिमित्त रंगली कुस्त्यांची दंगल!

## मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील हजारो मल्ल सहभागी

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने जालना शहरात प्रथमच मंगळवारी ( ता. १८) स्व. कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलात कुस्त्यांची दंगल घेण्यात आली. यात मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील 0१ हजार मल्लांनी सहभाग नोंदवला.

अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपाणी यांच्या हस्ते बजरंगबली आणि छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन तसेच कुस्ती लावून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, ज्येष्ठ नेते एकबाल पाशा,माजी उपनगराध्यक्ष राजेश राऊत, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सुदाम गवारे,मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख , अशोक पडूळ पाटील,जगन्नाथ काकडे, समितीचे अध्यक्ष करण राजे जाधव, स्वागताध्यक्ष ड. आनंद झा, कार्याध्यक्ष सागर पाटील , सचिव ड.लक्ष्मण उढाण, किरण शिरसाठ, लक्ष्मणराव सुपारकर,शिवाजी पैलवान शेळके,गणेश सुपारकर, ड. शैलेश देशमुख, रोहित देशमुख, अंकुश राजगिरे,शिवरत्नम आडेप, कारभारी रत्नपारखे, आदींची उपस्थिती होती.

अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपाणी यांनी मोबाईल ,व्हिडिओ गेम्स आणि मोबाईल च्या आहारी न जाता तरुणांनी मैदानी खेळाची कास धरावी. कुस्ती हा शक्ती आणि बुद्धीचा खेळ असून मराठा क्रांती मोर्चा उत्सव समितीने शिवजन्म ोत्सवानिमित्त आयोजित कुस्ती स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

प्रस्ताविकात अरविंद देशमुख यांनी शिवकाळात कुस्तीला मानाचे स्थान होते . शिवजन्मोत्सवानिमित्त स्पर्धेच्या म ाध्यमातून युवकांना पारंपारिक खेळाकडे नेण्याचा प्रयत्न समितीने केला असल्याचे सांगितले.

समितीचे अध्यक्ष करण राजे जाधव यांनी समितीतर्फे सामाजिक उपक्रम राबविले जात असून युवा पिढीला मैदानी खेळाची प्रेरणा मिळावी यासाठी कुस्ती स्पर्धा आयोजित केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुत्रसंचालन ड.स्वप्निल खराबे, यांनी केले तर सचिव किरण शिरसाठ यांनी आभार मानले.

स्पर्धा स्थळी माजी आ. अरविंदराव चव्हाण, प्राचार्य डॉ. दयानंद भक्त, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, अक्षय गोरंट्याल,उद्योजक गोपाल गोयल, बाबुराव मामा सतकर,सगीर अहेमद, बाला परदेशी, रमेश जाधव,वसंत जाधव, सतीश जाधव, शशिकांत घुगे, संदीप खरात, संतोष ढेंगळे, ,सचिन कांबळे,यांच्या सह मान्यवरांनी भेटी दिल्या.



पंच कमिटीत पै. विलास डोईफोडे, पै. सुधाकर कापसे,पै.गोविंद झुंगे, पै.कन्हैय्या भगत, पै. काठोठीवाले, कवल पठाण ,सय्यद अन्वर, बबन काजळे, म ाधव राऊत, सय्यद अफसर, वैजिनाथ राऊत,प्रा.शाम काबलिये, श्रीराम धानुरे, आदींनी काम पाहिले.

दिवसभरात १०० रु. च्या १५१,२०० च्या ५१,३०० च्या ३०० च्या ३१,५००रू. च्या ५१,तसेच एक हजार, पाच हजार,पासून पुढे कुस्त्या लावण्यात आल्या. पै. शरद भालेराव आणि पै. राजेभाऊ देवकाते यांनी समालोचन केले. यावेळी कुस्तीपटू आणि शौकिनांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

युवा आदर्श

### जल प्रेमी राजे ...

जल संपदा महत्व
शिवबा असे जाणुन
जल संवर्धनासाठी
करी योजना म्हणून
किल्ले बांधणे आधी
बावडी घेती खणून
नाले ओढे ते संपन्न
दुरुन पाणी आणून
अन्नधान्य पाणीसाठे
साठवले रे भरभरुन
प्रतापगडा तो वेढा
सहज पाडला हाणून
झाडी झुडपे जंगले
ठेवला वारसा जपून
इतिहास देतो साक्ष
कर्तृत्व गेले व्यापून
रयते कुणीन उपाशी
झोपे सुग्रास खाऊन
स्वराज्य योजनाबध्द
दुष्काळ पळे भिऊन
बळीराजा खरासुखी
स्वराज्याघास भरवून
असा राजा होणे नाही
सांगे जगाला मिरवून
राजेंच्या मनी निर्झर
जनप्रेम वाहे ओसंडून
शिवराय जयघोष गर्जे
क्षितीज पार ओलांडून

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालना महानगर पालिकेच्या कामकाजामुळे नागरिक त्रस्त - अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** महानगर पालिकेच्या कामकाजामुळे नागरिक त्रस्त झालेत अशी प्रतिक्रिया शिवसेना ठाकरे गट जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी मंगळवार (दि १८) रोजी शांतिनिकेतन शाळेजवळ दिली आहे. नवीन रस्त्याच्या मधोमध येणारे विद्युत खांब महानगर पालिकेने न



हटवल्याने अंबेकरांनी नाराजी व्यक्त केली आहे. महानगर पालिकेने आपल्या कामात सुधारणा करावी असा सल्ला देखील भास्कर अंबेकर यांनी महापालिका प्रशासनाला दिला आहे. महापालिकेने कामात सुधारणा न केल्यास भास्कर अंबेकर यांनी आंदोलनाचा इशारा दिला. रस्त्याच्या मधोमध येणारे विद्युत खांब बाजूला करावेत अशी मागणीही भास्कर अंबेकर यांनी यावेळी केली आहे.

## अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना -** जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामीण प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडी सेविकास व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजना तालुका प्रकल्पनिहाय पद भरती करण्यात येत आहे. तरी संबंधित महिलांनी अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी कोमल कोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

जालना-१ प्रकल्पात अंगणवाडी सेविका ५ व मदतनीस २५ पदे भरण्यात येणार आहेत. अंबड-१ प्रकल्पात अंगणवाडी सेविका १८ व मदतनीस ४४ पदे भरण्यात येणार आहेत. अंबड-२ प्रकल्पात अंगणवाडी सेविका ९ व मदतनीस १७ पदे भरण्यात येणार आहेत. घनसावंगी-१ प्रकल्पात अंगणवाडी सेविका १३ व मदतनीस ३३ पदे भरण्यात येणार आहेत. घनसावंगी-१ प्रकल्पात अंगणवाडी सेविका १८ व मदतनीस ३९ पदे भरण्यात येणार आहेत. भोकरदन-१ प्रकल्पात अंगणवाडी सेविका ४ व मदतनीस १४ पदे भरण्यात येणार आहेत. भोकरदन-२ प्रकल्पात अंगणवाडी सेविका ३ व मदतनीस २० पदे भरण्यात येणार **पान २ वर**

## आमचा एकही कार्यकर्ता माजी आमदार जेथलिया यांच्यासोबत राष्ट्रवादीत गेला नाही

### काँग्रेस पक्षाचे अनुसूचित जाती विभाग जिल्हाध्यक्ष बाळासाहेब अंभीरे यांचा दावा

**परतूर । प्रतिनिधी -** ज्यांच्यावर ३०२ सह परतुर न्यायालयात सत्तावीस खटले दाखल आहेत असे माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया हे काँग्रेस पक्षातून गेल्यामुळे आनंद झाला असून भ्रष्टाचारी जेथलियांसोबत आमचा मागासवर्गीय सम ाजातील एकही कार्यकर्ता गेला नसल्याचा दावा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब आंभीरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे. ज्यांनी पक्षाशी गद्दारी करत बंडाचा झेंडा हाती घेऊन निवडणूक लढवली होती, मात्र माझ्यासारखे अनेक निष्ठावान कार्यकर्ते, पक्षासोबतच राहिले असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

वाटुर येथील ग्रामपंचायत गेल्या पंचवीस वर्षापासून काँग्रेसच्या ताब्यात आहे असे धादांत खोटे बोलत आहे मात्र प्रत्यक्षात गेल्या पंचवार्षिक पासून स्थानिक स्तरावरील बहुजन विकास आघाडी नावाची सर्वपक्षीय आघाडीची ही ग्रामपंचायत असून जेथलिया यांच्या ताब्यात ही ग्रामपंचायत कधी होती जेथलिया यांनी उत्तर द्यावे असेही त्यांनी पत्रकात नमूद केले आहे

ज्यांना आम्ही नेते म्हणून सम जत होतो असे उपसरपंच बद्रीनारायण खवने यांनी माजी आमदार जेघलिया यांच्या डोळ्यात धुळपेकरत गेल्या अनेक वर्षापासून ही ग्रामपंचायत आपल्या ताब्यात आहे असे दर्शविल्याचे दुःख होत असून गेल्या दहा वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस भाजप शिवसेना काँग्रेस या सर्वच पक्षांतून सर्वसामान्य बहुजन विकास आघाडी निर्माण करून आम्ही ग्राम पंचायत लढवली होती त्याम ुळे जेथलिया यांनी खोटा दावा करू नये असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे



मी काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचा जिल्हाध्यक्ष असून माझ्यासोबत पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यामुळे वेळोवेळी मानहानी झाली मात्र कालही मी पक्ष सोबत होतो आजही पक्ष सोबत असल्याचे सांगतानाच , आपण काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते असून, सगळी काँग्रेस वेठीस धरणाऱ्या म ाजी आमदार जेथलिया यांनी वाटुर ग्रामपंचायत वर दावा केल्याने आपण अस्वस्थ झालो असून चेथलिया यांची ही दादागिरी खपवून घेणार नसल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे

# संपादकीय

## शिवरायांचे धोरण अन् आजची स्थिती

रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे. चार वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना असो की कोपर्डीच्या बहिणीची झालेली निर्घृण हत्या असो की अगदी काल परवा बदलापुरात झालेला चिमुरडी वरील अत्याचार ! या सर्व घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. केवळ याच घटना नाही तर यासारख्या अनेक घटना रोजच या पावन भूमीत घडत आहेत. महिलांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात आहे. आज या पावन भूमीत कोणतीच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. नराधमांना कायद्याचा धाक नाही. नराधमांना अटक होते त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जनतेतून उठाव होतो. मोर्चे निघतात. अनेक वर्ष न्यायालयात खटला चालतो. या नराधमांना फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्यांना जन्मठेपेची शिक्षा होते आणि ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हे नराधम वरच्या न्यायालयात अपील करतात. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी - विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात. रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मराठी भाषेला अभिजात दर्जा

महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याने या भाषेच्या विकासाची वाट आणि त्यासाठी आवश्यक असणारा पैसा उपलब्ध होणार आहे. मात्र या वाटेवरून मराठी भाषिकांना प्रगती पथावर वाटचाल करून मराठी भाषा वापराला, लेखनाला आणि वाचण्याला कशी सोयीची होईल हे बघावे लागेल आणि मराठी भाषेच्या विकासासाठी सोपा आणि सुटसुटीत शब्दसंग्रह विशेषतः विज्ञान, तंत्रज्ञान, कायदा, शासकीय व्यवहार, तत्वज्ञान या विषयातील,विकसित करून त्याचा प्रसार आणि प्रचार सामान्य माणसापर्यंत करावा लागणार आहे. शासनाने सरकारी कामकाजाची शब्दावली तयार केलेली आहे पण ती वापरायला अतिशय अवघड आहे ती ग्रामीण साधारण शिकलेल्या व्यक्तीला समजणारी नाही. ती साधारणपणे इंग्रजी शब्दांचे भाषांतर किंवा अनुवाद असल्याने ती समजण्यास अवघड झाली आहे. ही शब्दावली जर एकदम नवीन पण समजायला सोपी केल्या गेली, जसे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अनेक सहज तोंडात बसणारे नवीन शब्द मराठीला दिलेले आहेत, तर ते वापरातही येतील आणि भाषा पण समृद्ध होईल.

इतर भाषेतील पुस्तके किंवा त्यात असलेली माहिती, ज्ञान जेंव्हा मराठीत आणण्याचा प्रयत्न अनुवादक करत असतो तेंव्हा ही योग्य शब्द शोधण्याची अडचण आणि तसे शब्द मराठी भाषेत यावेत याची जाणीव अनुवादकाला नेहमीच होत असते. पंक्चर याला चाकाचे छिद्रीकरण किंवा रेल्वे सिग्नल यास अग्निरथ आवक जावक सूचक असे अनुवाद बोजड ठरतात आणि वाचकाला ते वाचताना नैसर्गिक कंटाळा येतो.

भाषा आणि भाषिक याचे नाते साधारणपणे देव आणि भक्तासारखे असते. यांच्यात शक्ती आणि भक्ती याचा संबंध असतो. भक्ताच्या भक्तीतून, श्रद्धेतून त्या श्रद्धास्थानाची शक्ती वाढते तर श्रद्धास्थानाच्या संकटमोचनाच्या शक्तीमुळे भक्तांची भक्ती वाढते. आणि तसेच काहीतरी भाषा आणि भाषिकांचे आहे. भाषेचे सौष्ठव, त्याचा प्रभाव जितका जास्त तितकी भाषिकांची भक्ती जास्त आणि जितकी भाषिकांचा भाषेचा उपयोग जास्त तेवढी भाषेची शक्ती जास्त. आजतरी भाषेचा उपयोग कमी त्याचा प्रभाव कमी कारण दैनंदिन व्यवहारातील शब्द संपदा अविकसित आहे. ती शब्दसंपदा जर विकसित झाली आणि ती वापरला जर सोपी असली तर अभिजात दर्जा मिळाल्याचा मराठीवर प्रेम करणाऱ्या मराठी भाषिकांना खरा आनंद मिळेल.

भाषेचा उगमच मुळी आपल्या भावना, विचार याचे आकलन इतर व्यक्तींना व्हावे, आपले आणि त्यांचे विचार सारखे आहेत हे कळावे या साठी झाला. ही झाली बोली भाषा आणि लिखित भाषा त्या भावना, ते विचार अनेकांना कळावे म्हणून झाला.

मराठीच्या तुलनेत संस्कृत आणि हिंदी भाषा जास्त समृद्ध आहे तेंव्हा त्यातील शब्द जरी मराठीने आत्मसात केले किंवा तसेच पण सोपे शब्द निर्माण केले तर मराठी भाषेचा वापर वाढेल आणि मराठी भाषिकही वाढतील.

सर्व उद्योग, व्यवसाय, व्यापार, समाजकारण, राजकारण, शिक्षण, शासकीय कामकाज, स्वास्थ्यसेवा, वैद्यकशास्त्र, शल्यशास्त्र, तंत्रज्ञान, विज्ञान याला लागणारे सोपे प्रतिशब्द जर निर्माण करता आले आणि त्याचा प्रसार, प्रचार झाला तर अभिजात दर्जा मिळाल्याचा आनंद मराठी भाषिकांना नक्कीच मिळेल. त्यासाठी शुभेच्छा.

**विनयकुमार देशपांडे,**
**व्यवस्थापन सल्लागार, जालना.**
**भ्रमण ध्वनी ९४२२२ १७८६८**

# जाणता राजा, शिवरायांचे आठवावे रुप । शिवरायांचा आठवावा प्रताप, शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी ।।

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी हे शिवाजीराजे, शिवबा, शिवराय, शिव, शिवा अशा अनेक नावांनी ओळखले जातात त्यांचा जन्मदिवस हा 'शिवाजयंती' म्हणुन साजरा होतो. शिवाजी महाराजांच्या जन्माने आपली मातृभूमी पावन झाली. राजमाता जिजाऊच्या गुणांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज घडले. शिवाजी महाराजांनी सर्व जातीच्या लोकांना मावळ्यांच्या रुपाने एकत्रीत केले. सुव्यवस्थित आणि शिस्तबध्द प्रशासन स्थापन केले. 'स्वराज्य' निर्माण केले. गनिमी कावा युद्धाची शैली, शिवसुत विकसीत केले. महाराजांनी काबीज केलेला पहिला किल्ला म्हणजे तोरणा होय. त्यानंतर त्यांनी ३६० किल्ले जिंकले. शिवछत्रपतींनी आपली तलवार कधीही निष्पाप लोकांच्या रक्ताने रंगू दिली नाही. नवीन आरमार निर्मीती, नवीन कायदे करणे, नवी शहरे बसवणे, स्वधर्म स्थापन करुन त्याचे ऐश्वर्य वाढविले. शिवाजी महाराजांचे वर्तन न्यायाचे, नीतिचे, पराक्रमाचे व परधर्म सहिष्णुतेचे होते. शिवछत्रपतींनी कधीही रुढी परंपरांना, अंधश्रध्दांना आपल्या जीवनात स्थाने दिले नाही. महाराजांनी कित्येक लढाया अमावस्येला केल्या आणि ते जिंकले सुद्धा वडील शहाजी राजेंचे निधन झाल्यावर त्यांनी जिजाऊ माँ साहेबांना सती जाऊ दिले नाही. महाराजांच्या विरोधात लढणारे मोगल, निझाम, आदिलशहा, कुतुबशहा हे धर्माने मुस्लिम होते, पण शिवछत्रपतींनी कधीही मुस्लिमांचा द्वेष केला नाही. याउलट नुर खान बेग, आरमार प्रमुख दर्यासारंग, बाबा याकुत, मदारी मेहतर हे तर त्यांचे निष्ठावंत सरदार होते. महाराज हे मुस्लिमांचे शत्रू नव्हते. तर ते शत्रू होते अन्यायाचे, अत्याचारी प्रवृत्तीचे, शिवाजी महाराजांवर तलवारी उपासल्या, तेंव्हा ते वार आपल्या छातीवर झेलणारे वीर मुस्लिमच होते. हा इतिहास नाकारता येणार नाही. छत्रपतींनी न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यावर आधारलेले निधर्मी आदर्श स्वराज्य निर्माण केले होते. महाराजांचा लढा हा राष्ट्रीयत्वाचा होता ! महाराष्ट्राचा हा 'जाणता राजा' प्रत्येक पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत राहिला आहे. आणि पूढील पिढीसाठी देखील राहणार आहे. इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर, मतीच्या कणावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर, राज्य करणारा राजा म्हणजे राजा शिवछत्रपती. आपण त्यांच्यातील एकतरी गुण आमलात आणावा व तो अंगीकारावा, तरच खऱ्या अर्थाने आपल्याकडून शिवजयंती साजरी होईल. चला तर मग छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर मार्गक्रमण करण्याचा थोडा तरी प्रयत्न करु यात!

**स्वाती कोलते आग्रे, शिक्षिका**

### छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग अन् प्रखर राष्ट्र व धर्म निष्ठा लोकांपर्यंत पोहोचूया!

# 'छावा' चित्रपटाला करमुक्त करण्याची हिंदु जनजागृती समितीची मागणी !

**मुंबई** - धर्मवीर आणि हिंदवी स्वराज्याचे महान रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' हा हिंदी चित्रपट महाराष्ट्रात तातडीने करमुक्त (ढ्ठ-ॠशश) करावा, अशी हिंदु जनजागृती समितीची मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. या विषयीचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मान. मुख्यमंत्री, मान. सांस्कृतीक कार्यमंत्री आणि मान. महसूलमंत्री यांना देण्यात आले आहे. हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि प्रखर राष्ट्र-धर्म निष्ठेची गाथा आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो. छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे गौरवशाली व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या अतुलनीय बलिदानामुळे स्वराज्य अधिक सक्षम झाले आणि त्यांच्या शौर्याने प्रखर स्वदेशप्रेम आणि धर्मनिष्ठेचा मोठा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. 'छावा' हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय पराक्रमाच्या कथेला जिवंत करतो. महाराष्ट्र सरकारने पूर्वी ऐतिहासिक चित्रपटांना प्रोत्साहन दिले आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांवर चालणार्या महाराष्ट्रातील महायुती शासनाने 'छावा' चित्रपटाला करमुक्त करण्याची आवश्यकता आहे.




चित्रपटाचे दर कमी झाल्यास महाराष्ट्रातील समस्त युवक, विद्यार्थी आणि सामान्य जनता या चित्रपट पाहू शकेल. छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा लोकांपर्यंत पोहोचेल. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन होईल. भविष्यातही असे ऐतिहासिक चित्रपट तयार करण्यासाठी अनेक दिग्दर्शक आणि निर्माते प्रेरित होतील, असेही समितीने आपल्या पत्रात म्हटले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

### सदस्यता नोंदणी व सक्रिय सदस्यते संदर्भात पदाधिकारी व प्रमुखांची कार्यशाळा

# प्रत्येकाने आपल्याला दिलेले टार्गेट पुढील २ दिवसात पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा - आ लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा सदस्य संख्या असलेला पक्ष असून, पक्षाची पाळे मुळे आणखी घराघरापर्यंत रुजवण्यासाठी प्रत्येक बूथवर किमान ३०० सदस्य करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले,

सक्रिय सदस्य होण्याच्या पात्रतेसाठी किमान १०० सदस्य करणे आवश्यक असून, त्यासाठी बूथ प्रमुखांनी व गावातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत नोंदणी करावी असे यावेळी बोलताना ते म्हणाले

कार्यकर्त्यांच्या बळावरच पक्षाने एवढ्या मोठ्या कशाला गवसणी घातलेली असून, हे यश अविरत टिकवण्यासाठी, केंद्रातील मोदी सरकार राज्यातील फडणवीस सरकारने घेतलेले सर्वसामान्य जनतेसाठीची निर्णय वैयक्तिक लाभा च्या योजना घराघरापर्यंत पोहोचून भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील केंद्रातील व राज्यातील सरकार हे खऱ्या अर्थाने जनकल्याणकारी सरकार असून आपण घराघरातील लाडक्या बहिणी, युवक, विविध घटकांपर्यंत पोहोचून सदस्यता नोंदणी केल्यास खऱ्या अर्थाने आपल्याला मिळालेली टार्गेट आपण सहज पार करूत असेही यावेळी बोलताना ते म्हणाले




पुढे ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या वाटचालीत अनेकांचा सिंहाचा वाटा असून लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, जेपी नड्डा देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वामध्ये भारतीय जनता पार्टी खऱ्या अर्थाने महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वात बलवान पक्ष असून या बलवान पक्षाचे आपण कार्यकर्ते आहोत त्यामुळे आपण स्वतःला झोकून देऊन काम केल्यास निश्चित पणे यश मिळेल असेही ते म्हणाले. येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून, त्या जिंकण्याची शिवधनुष्य आपल्या सर्वांना मिळून उचलायची असून ते यशस्वी करून दाखवायचे आहे त्यासाठी सदस्यता नोंदणीच्या माध्यमातून घराघरापर्यंत संपर्क करण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर शत्रुघ्न कणसे, संपत टकले, भगवान मोरे, संभाजी वारे , माणिकराव वाघमारे, सिताराम राठोड पद्माकर कवडे, सिद्धेश्वर केकान उद्धव गुंजाळ गजानन लोणीकर, मधुकर मोरे बाबाराव थोरात, माजी उपनगराध्यक्ष संदीप बाहेकर, एड काळे, नरेश कांबळे, सचिन लिपणे, केशव ढवळे , किरण अंभोरे संभाजी खवल मेहराज खतीब, रामजी कोरडे, केडी भदर्गे, भगवान आरडे, विश्वंभर शेळके , हनुमान चिखले जगदीश पडोळकर, उद्धव वायाळ, सनी तनपुरे, आसिफ कच्ची, श्रीधर गांजाळे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी बूथ प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## शिवाजी चरित्र वाच

शिवाजी चरित्र वाच रे
संग्राम त्यांचा वाच !
कठीण काळातही लढले ते
अनेक गढ जिंकले ते
रात्रंदिन प्रयत्न करून
लढा यशस्वी करणारे
शिवाजी चरित्र वाच
संग्राम त्यांचा वाच !
बुद्धीच्या जोरावर लढलेले
मावळ्यांच्या साथीने जिंकलेले
अठरापगड जातींना घेऊन सोबत
स्वराज्य स्थापना करणारे
शिवाजी चरित्र वाच
संग्राम त्यांचा वाच !
मनामनात वसलेले
विश्वात साऱ्या गाजलेले
कीर्तीचा कळस चढलेले
पराक्रमी वारसा देणारे
शिवाजी चरित्र वाच
संग्राम त्यांचा वाच !
परस्त्रीला आई मानणारे
चोळी बांगडी करून सन्मान देणारे
शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे करणारे
जीवाची पर्वा न करता जनतेसाठी लढणारे,
शिवाजी चरित्र वाच
संग्राम त्यांचा वाच !

नम्रता अनिल खंदारे ( शिक्षिका )
न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल,
परतुर, जिल्हा -जालना

### कानिफनाथ महाराज देवस्थान प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाची वक्फ बोर्ड व मुस्लीम गटांना कारणे दाखवा नोटीस !

# हिंदू धार्मिक हक्कांचे संरक्षण करण्याच्या दिशेने एक पाऊल ! - महाराष्ट्र मंदिर महासंघ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** कानिफनाथ महाराज देवस्थान (गुहा, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) प्रकरणात हिंदू भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने देवस्थान प्रकरणात मुसलमान गटांना आणि महाराष्ट्र वक्फ बोर्डाला 'कारणे दाखवा नोटीस' बजावण्याचा आदेश दिला आहे. या प्रकरणात गुहा ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे स्थानिक पदाधिकारी अन् भाविक यांच्या वतीने हिंदु जनजागृती समितीचे अधिवक्ता (पूज्य) सुरेश कुलकर्णी यांनी प्रभावी युक्तिवाद केला. हा न्यायालयाचा आदेश हिंदू धार्मिक हक्कांचे संरक्षण करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे, असे महाराष्ट्र मंदिर महासंघाने म्हटले आहे.



संत कानिफनाथ महाराज हे नाथ संप्रदायातील एक महान संत होते. त्यांनी राहुरी तालुक्यातील गुहा येथे कठोर तपश्चर्या आणि ध्यानसाधना केली होती. त्यामुळे हे ध्यानस्थळ हिंदू भाविकांसाठी श्रद्धेचे ठिकाण असून येथे पूजा-अर्चा, आरती व धार्मिक विधी पार पडतात; मात्र काही मुस्लिम गटांनी आणि महाराष्ट्र वक्फ बोर्डाने मिळून या स्थळाला 'हजरत बाबा रमजान शहा दर्गा' असल्याचा दावा केला. महसुली अभिलेखांमध्ये फेरफार करून या स्थळावर मुस्लिमांची मालकी असल्याचा प्रयत्न करण्यात आला.

हिंदू भाविकांना पूजेसाठी आणि गुरुवारी होणार्या धार्मिक विधींना आडकाठी आणली गेली. पौर्णिमेच्या उत्सवांवर बंधने घालण्याचा प्रयत्न झाला. पुजार्यांना धमकावले गेले आणि त्यांच्यावर हल्लेही झाले. हिंदू भाविकांना त्यांच्या धार्मिक स्थळावरून जबरदस्ती हुसकावण्याचा प्रयत्न झाला. या अन्यायाविरोधात गुहा ग्रामपंचायत आणि हिंदू भाविकांनी एकत्र येऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल (नागरी पुनरावलोकन अर्ज क्र. ४७/२०२५) केली. याचिकेत मागणी करण्यात आली की, कानिफनाथ महाराज देवस्थानावरील पूजा-अर्चेवरील बंदी उठवण्यात यावी. मुस्लिम गटांनी महसुली अभिलेखांमध्ये घुसडलेली बेकायदेशीर नोंद रद्द करण्यात यावी. मंदिरावरील कोणत्याही प्रकारची बंधने हटवण्यात यावीत. न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांनी या प्रकरणाची दखल घेत महाराष्ट्र वक्फ बोर्डाला आणि मुस्लिम गटांना ''कारणे दाखवा नोटीस'' बजावण्याचा आदेश दिला.

हिंदू धार्मिक स्थळांचे रक्षण करण्यासाठी मोठे यश मानले जात आहे. बेकायदेशीर महसुली फेरफार, तसेच कानिफनाथ महाराज देवस्थानवरील अन्यायकारक निर्बंध हटवण्यासाठी पुढील पाऊल पडले तर हिंदू भाविकांना त्यांच्या श्रद्धास्थळी पुन्हा निर्भयपणे पूजा-अर्चा करण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. कानिफनाथ महाराज देवस्थान वाचवण्यासाठी धर्माभिमानी नागरिकांनी जागरूक राहावे व आपली भूमिका ठामपणे मांडावी, असे महाराष्ट्र मंदिर महासंघाने म्हटले आहे.

## अंगणवाडी सेविका ...

पान १ वरुन

आहेत. जाफ्राबाद प्रकल्पात अंगणवाडी सेविका १२ व मदतनीस २६ पदे भरण्यात येणार असून या सर्व प्रकल्पात अर्ज स्विकारण्याचा दि.२४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आहे. तसेच परतूर प्रकल्पात अंगणवाडी सेविका ९ व मदतनीस १६ पदे आणि मंठा प्रकल्पात अंगणवाडी सेविका ५ व मदतनीस २९ पदे भरण्यात येणार असून या दोन प्रकल्पात अर्ज स्विकारण्याचा दि.२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आहे. जालना-२ प्रकल्पात अंगणवाडी सेविका १२ व मदतनीस ३५ पदे भरण्यात येणार असून अर्ज स्विकारण्याचा दि.२१ फेब्रुवारी २५ पर्यंत आहे. बदनापूर प्रकल्पात अंगणवाडी सेविका ६ व मदतनीस ४४ पदे भरण्यात येणार असून अर्ज स्विकारण्याचा दि.२५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.






# लॉयन्सच्या उपक्रमातून १०२५ मुलींचे गर्भमुख कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण

## महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल; ३८ दिव्यांग मुलींचाही उत्स्फूर्त सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** प्रांतपाल गिरीश सिसोदिया, प्रांतीय कॅन्सर प्रतिबंध लसीकरण समन्वयक किशोर बहराणी यांच्या प्रयत्नातून लॉयन्स क्लब ऑफ जालना आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यम ाने मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी आयोजित म ोफत गर्भमुख प्रतिबंधक अर्थात सर्वाइकल कॅन्सर लसीकरण अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभरात १ हजार २५ मुलींचे लसीकरण करण्यात आले. या मोहिमेतील विशेष बाब म्हणजे गुरु गणेश दृष्टीहीन विद्यालयातील ३८ मुलींचा सहभाग. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहणाऱ्या या मुलींनी मोठ्या आत्म विश्वासाने पुढे येऊन लसीकरण करवून घेतले. त्यांचा हा सकारात्मक दृष्टिकोन आणि जनजागृतीचे महत्त्व ओळखण्याची संवेदनशीलता कौतुकास्पद आहे.

या शिबिराचे उद्घाटन प्रांत ३२३४ एच - २ चे प्रांतपाल गिरीश सिसोदिया यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया, माजी प्रांतपाल विजयकुमार बगडिया, प्रांतीय जीएसटी कॉर्डिनेटर मीनाक्षी दाड, क्रांती कॅन्सर प्रतिबंधक समन्वयक किशोर बेहराणी, प्रांतीय कोषाध्यक्ष जयेश ललवाणी, कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबईच्या संचालिका प्रिया प्रसाद, लाईन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी यांची उपस्थिती होती.

जालना जिल्ह्यातील मुलींना गंभीर अशा सवाईकल कॅन्सर या आजारापासून सुरक्षित ठेवणे आणि भविष्यातील आरोग्यसंकटांना प्रतिबंध करणे हा या अभियानामागील उद्देश आहे. या मोहिम ेसाठी मुंबईहून तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आली होती. स्थानिक डॉक्टर, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या परिचारिकांनी त्यांना सहकार्य केले. सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत १ हजार २५ मुलींचे लसीकरण करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना प्रांतपाल गिरीश सिसोदिया म्हणाले की, सवाईकल कॅन्सर लसीकरण हे प्रांतातील सहावे तर मराठवाड्यातील पहिले नाविन्यपूर्ण शिबिर आहे. यासाठी आदित्य बिर्ला ग्रुपचे सहकार्य लाभले आहे. हा पहिलाच उपक्रम असल्याने जालना लॉयन्स क्लबने मोठी मेहनत घेऊन जनजागृती केली. दुसऱ्या टप्प्यात एवढे कष्ट करावे लागणार नाहीत. जनजागृतीसाठी महिला मंडळ, महिला संघटनांनी प्रयत्न करावेत, असे सांगून हा उपक्रम लॉयन्स क्लबला नव्या उंचीवर नेईल, असा विश्वास



त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी मुंबईवरून आलेल्या तज्ञ डॉक्टरांची टीम, स्थानिक डॉक्टर्स, आरोग्य विभागाच्या डॉ. संगीता राजे- देशमुख, डॉ. प्रज्ञा कुलकर्णी, या शिबिरासाठी समाज स्तरावर जनजागृती करणारे डॉ. कांतीलाल राठी, कमलबाबू झूनझूनवाला, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे महामंत्री सत्यनारायण सारडा, दामोधर बजाज, कीरण राठी, राजेश्री भक्कड, विना लाहोटी यांच्यासह अतुल लड्ढा, अरुण मित्तल, प्रकल्प प्रमुख बालाप्रसाद भक्कड, द्वारकादास मुंदडा, विजय दाड, डॉ. गिरीश पाकणीकर, जगत घुगे, बळीराम बेंद्रे, राजेश लुनिया, डॉ. संगीता देशमुख, दिनेश चांडक, पी. के. खरात, मीता भुतिया, विठोबा दराडे यांचा प्रांतपाल सिसोदिया यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

## हरी प्राप्तीसाठी संतांची शरणागती करावी - डॉ प्रमोद कुमावत



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** आनंद हा माणसाचा स्थायी भाव आहे व दुःख हे अल्पकालीन आहे पण मनुष्य दुःखाला उगाळत बसतो व आनंदाला मुकतो. साधू संतानी जगाला आनंद दिला व तेही आनंदाने जगले. त्यांच्या जीवनात बाह्यांगाने अनेक संकटे, दुःख होती पण त्यांनी दुःखाला न चिकटता आनंदाला जवळ केले व आनंद वाटला. आनंद व सुख म्हणजेच परमात्मा होय व त्याची प्राप्तीचा उपाय म्हणजे संतांची शरणागती, संतसहवास हा होय असे प्रतिपादन चैतन्यसाधना प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेदांताचार्य डॉ प्रमोद कुमावत यांनी समर्थ नगर जालना येथील श्रीसंत गजानन महाराज मंदिरात आयोजित कीर्तन प्रसंगी बोलताना केले. श्रीसंत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांचा हरी प्राप्तीसी उपाय धरावे संतांचे ते पाय, तेणे हसाधती साधन तुटती भवाचे बंधन, संताविन प्राप्ती नाही ऐसे वेद देती ग्वाही, एकाजनार्दनी संत पूर्ण करीती मनोरथ या अभंगावर त्यांनी निरुपण केले. पुढे बोलतांना ते म्हणाले, आत्मा हा आनंदस्वरूप आहे, तेच चैतन्य सर्वत्र भरले आहे. मानवी देह हा अल्प काळासाठी भेटलेला आहे तेव्हा सर्वांनी संतांना शरण गेले पाहिजे. आनंदाने जगण्यासाठी आपले मन, बुद्धी, चित्त या अंतःकरणाच्या वृत्ती शुद्ध केल्या पाहिजेत त्यासाठी ईश्वरसेवा, गुरुसेवा, मानवसेवा केली पाहिजे. कोण्याही प्राण्याचा द्वेष, मत्सर, हेवा केल्याने त्यापेक्षा आपल्या स्वतःचे नुकसान जास्त होते. भारतीय संस्कृती आपल्याला महान व व्यापक बनण्याचा संदेश देते. विश्वात्मक देवाचे आपण पुत्र आहोत म्हणून आपणही व्यापक आहोत पण या संकुचीत विचाराने आपण हे विसरलो आहोत तेव्हा आपण आपल्या शुद्ध स्वस्वरुपला ओळखले पाहिजे हेच कार्य श्रीसंत गजानन महाराज यांनी केले आहे व ते आजही त्यांच्या विचाराद्वारे करीत आहेत.

यावेळी हभप सागर महाराज चापाईतकर, हभप डॉ दीपक महाराज कोल्हे, हभप बाबाराव महाराज कायंदे, हभप डॉ ऋषी बाबा शिंदे, संदीप भांदरगे, अशोक चुनखडे, ढाकणे सर, पडुळ सर, सोनुने गुरूजी, हभप सिरसाठ महाराज, दिगंबर मोरवाल, भागवताचार्य निर्गुणाताई इंगळे आदि भाविक मोठ्या संखेने उपस्थित होती.

## हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला

**मुंबई -** काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर आज हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते देखील उपस्थित होते. या कार्यक्रमात नाना पटोले, खासदार वर्षा गायकवाड यांच्यासह काँग्रेसच्या नेत्यांनी भाषणे करत महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीबाबत भाष्य केलं. तसेच आगामी म हापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देखील यावेळी नेत्यांनी भाष्य केलं.


